# पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्र.०२०–२५६०११८९/११९०
फॅक्स नं. : ०२०–२५६९७३८८
संकेतस्थळ: www.unipune.ac.in

आरक्षण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७

संदर्भ क्र. आरक्षण/२२/९८

दिनांक – १/२/२०१२

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय – मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या कार्यवाहीबाबत.
संदर्भ – शासन पत्र क्र.संकीर्ण–२०१२/(१६/१२)विशि–१, दि. २५/१/२०१२.
या कार्यालयाचे परिपत्रक क्र.आरक्षण/ओ २२/९७४, दि. २६/८/२०११.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, मागासवर्गीयांचा अनुशेष भरला जाण्याच्या दृष्टीने विशेष भरती मोहिम राबविण्यासंदर्भात शासनाने निर्गमीत केलेल्या शासन निर्णयाची प्रत सर्व संबंधित महाविद्यालये/संस्थांना कार्यवाहीसाठी यापूर्वीच पाठविण्यात आलेली आहे तसेच महाविद्यालय/संस्थेतील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गाची बिंदूनामावली प्रमाणित करुन घेण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

शासन पत्र क्र. संकीर्ण २०१२/(१६/१२)विशि–१, दि. २५/१/२०१२ ची प्रत सोबत जोडत असून मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या दृष्टीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अनुशेषाच्या माहितीसह विहित प्रपत्रात आठ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावा. सदर माहिती अनुदानित व विनाअनुदानित अशी स्वतंत्र सादर करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

1/2/2012
सहा.कुलसचिव
(आरक्षण कक्ष)

सोबत – वरीलप्रमाणे

आरक्षण कक्ष
पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७
दिनांक - 30/1/12, आवक क्र.- 125
विभाग -

महाराष्ट्र शासन

क्रमांक :संकीर्ण-२०१२/(१६/१२)/विशि-१
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - २५ जानेवारी, २०१२

मा. कुलसचिव कार्यालय
पुणे विद्यापीठ, पुणे-७.
आवक क्र.-आर/ 256
दिनांक - 28/01/12
जावक दिनांक- 30/01/12
विभाग - Admin
- Teaching unit
- Reservation cell.

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,

२) कुलसचिव
अ) डेक्कन कॉलेज व पदव्युत्तर संशोधन संस्था, पुणे
ब) टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे
क) गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे

**विषय : मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या कार्यवाहीबाबत.**

संदर्भ : १) शासनाचे समक्रमांकाचे दि.१९ जानेवारी, २०१२ चे पत्र
२) मावअ-२०११/प्र.क्र.४६-२०११/आस्था-२, दि.२३.१.२०१२ चे पत्र
प्रत संलग्न

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे नमूद करण्यात येते की, राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठे व वरील संस्थांच्या आस्थापनेवरील मागासवर्गीयाचा अनुशेष भरण्यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी आपणास अवगत करण्यात आले आहे. यासंदर्भात मा.मुख्य सचिव यांच्या क्रमांक-बीसीसी-२०११/प्र.क्र.७०६/२०११/१६-ब, दि.९ ऑगस्ट,२०११ चे अर्ध शासकीय पत्र क्र. -बीसीसी-२०११/ प्र.क्र.२४४/११/१६-ब, दि. ३ डिसेंबर, २०११ च्या अर्ध शासकीय पत्रान्वये दिलेल्या सविस्तर निर्देशानुसार आपल्याकडील संवर्गनिहाय अनुशेषाचा डिसेंबर, २०११ अखेर पर्यंतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल पाठविण्याबाबत सर्वंकषपणे सूचना देण्यात आल्या आहेत. आता पुनश्च उक्त दोन्ही अर्ध शासकीय पत्राच्या प्रती आपणाकडे माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी त्यासोबतच्या **विवरणपत्र** - १ (सरळसेवा भरती - अ,ब,क,ड गटनिहाय आणि **विवरणपत्र -२** पदोन्नती अ,ब,क,ड गटनिहाय सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी असेही नमूद करण्यात येते की, आपल्या विद्यापीठाच्या / संस्थेच्या आस्थापनेवरील शिक्षक व शिक्षकेतर संवर्गामध्ये एकूण असलेल्या पदांच्या बिंदू नामावल्या तयार करुन त्यास शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाची (मागासवर्गीय तपशील) यांचेमार्फत तपासणी

करुन त्यानंतरच आस्थापनेवरील एकूण संवर्गनिहाय (Cadrewise) तपशील जसे, सहायक प्राध्यापक (Asstt. Professor) , सहयोगी प्राध्यापक (Asso. Professor) आणि प्राध्यापक (Professor) तद्वतच विद्यापीठाच्या प्रशासन विषयक विविध पदांची एकूण संख्या व त्यांच्या बिंदू नामावल्याप्रमाणे प्रत्येक संवर्गाची व प्रत्येक प्रकारच्या भरतीची (सरळसेवा, पदोन्नती इ.) बिंदूनामावली लिहिली जाईल व त्यास संबंधित प्राधिका-यांकडून **तात्काळ** प्रमाणित करुन घेतली जाईल याची कृपया नोंद घेण्यात यावी.

३. यासंदर्भात सोबतच्या अर्ध शासकीय पत्रामध्ये दिलेल्या सर्वंकष निर्देशांची दखल घेऊन संवर्गवर्गनिहाय (Cadrewise) अनुशेषाची परिगणना करुन त्याचा सविस्तर व एकत्रित अहवाल दि.१० फेब्रुवारी, २०१२ पूर्वी संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत शासनाकडे तात्काळ सादर करण्याची विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(रा. गो. जाधव) 25.1.2012

शासनाचे उप सचिव

प्रत माहितीसाठी अग्रेषित -

१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना विनंती की, सदर प्रकरणी सर्व अकृषि विद्यापीठे व संस्था यांच्याकडे सदर प्रकरणाच्या अनुशेषाचा संवर्गनिहाय (Cadrewise) वस्तुस्थितीदर्शक अहवाल आपल्यामार्फत प्रमाणित करुन शासनाकडे दि.१५ फेब्रुवारी, २०१२ पूर्वी सादर करण्याची व्यवस्था करावी.
२) प्रधान सचिव (उ व तंशि) यांचे स्वीय सहाय्यक
३) सहसचिव (आस्थापना),उच्च व तंत्रशिक्षण विभाग.

D:\ssd\Letter-25.1.12.doc

महत्त्वाचे / तात्काळ

क्रमांक : मावअ-२०११/प्र.क्र. ४६-२०११/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३.१.२०१२

प्रति,

**सहसचिव** (महाविद्यालयीन शिक्षण / व्यवसायशिक्षण / ग्रंथालय / आस्था)
**उपसचिव** (विद्यापीठ शिक्षण / तंत्रशिक्षण / कला), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,

**विषय :** मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या कार्यबाहीबाबत...

**संदर्भ :** शासनपत्र समक्रमांक दिनांक २६.१२.२०११ पर्यंतचा पत्रव्यवहार

**महोदय,**

उपरोक्त विषयासंदर्भात मा. प्रधान सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली, दिनांक २३.१.२०१२ रोजी संपन्न झालेली बैठक आणि बैठकीत मा. प्रधान सचिव यांनी दिलेल्या निदेशाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. त्यानुसार, -

अ) शासकीय व निमशासकीय सेवेतील, मागासवर्गीयांचा सरळसेवा व पदोन्नतीमधील अनुशेष मार्च,२०१२ पर्यंत दूर करावयाचा आहे. त्याकरिता अनुशेषाची परिगणना आणि बिंदूनामावली प्रमाणित करणे क्रमप्राप्त आहे.

**अनुशेषाची परिगणना करताना, शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग दिनांक २.८.२०११ सोबतच्या प्रपत्रानुसार प्रत्येक संवर्गनिहाय करावी. असा संवर्गनिहाय काढलेला अनुशेष गटनिहाय एकत्रित करुन उदा. अ गटात येणाऱ्या सर्व संवर्गांची माहिती अ गटात, त्याचप्रमाणे ब,क,ड गटाची माहिती साप्रविच्या दिनांक ९.८.२०११ सोबतच्या विवरणपत्र १ व २ मध्ये एकत्रित करुन, सादर करावी. अशी परिगणना, त्या-त्या संवर्गाचे जे नियुक्ती प्राधिकारी आहेत, त्यांनी करुन, पदे भरण्याची कार्यवाही करावी.**

क) आपल्या अधिनस्त प्रत्येक संवर्गाची आणि प्रत्येक प्रकारच्या भरतीची, उदा. सरळसेवा / पदोन्नती, बिंदूनामावली लिहून ती सक्षम प्राधिकाऱ्याकडून, ३०.९.२०११ पर्यंत प्रमाणित करण्याच्या मा. मुख्य सचिवांच्या सूचना आपणांस दिनांक १८.८.२०११ रोजी अवगत केलेल्या आहेत. त्यानुसार प्रत्येक नियुक्ती प्राधिकाऱ्याने, त्यांच्या अधिनस्त प्रत्येक संवर्गाची बिंदूनामावली लिहून, सक्षम प्राधिकाऱ्यांकडून तात्काळ प्रमाणित करुन घ्यावी आणि याबाबतची माहिती आपणांस यापूर्वी पाठविलेल्या प्रपत्रात सादर करावी. अनुशेषाची सर्व पदे मार्च,२०१२ पूर्वी भरण्याच्या सूचना मा. मुख्य सचिवांनी दिलेल्या आहेत. त्यामुळे बिंदूनामावली तात्काळ प्रमाणित करुन घेणे क्रमप्राप्त आहे.

ड) दिनांक १५.६.१९९५ पूर्वी व त्यानंतर, अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्याआधारे, शासकीय सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील शासनपत्र दिनांक १२.१.२०१२ व १८.१.२०१२ अन्वये मागविलेली माहितीमध्ये, क्षेत्रिय स्तरावर कार्यरत असलेल्या प्रत्येक कार्यालयातील, तसेच अनुदानित अशासकीय संस्था व विद्यापीठे यांच्या माहितीचा अंतर्भाव क्रमप्राप्त आहे. सबब, त्याप्रमाणे सुधारित माहिती आपणांस उपलब्ध करुन दिलेल्या तक्त्यात तात्काळ सादर करावी.

१) वरील अ/ब/क/ड येथील कार्यवाहीची माहिती **अनुदानित अशासकीय संस्था यांच्यासंदर्भात**सुद्धा सादर करणे क्रमप्राप्त आहे. सबब, अशी माहिती प्रत्येक संचालकांनी संस्थांनिहाय एकत्रित करुन, शासकीय माहितीकरिता विहित केलेल्या नमुन्यातच मात्र **स्वतंत्रपणे सादर करावी.**

२) उपरोक्तप्रमाणे व अन्य माहिती एकत्रित करताना असे निदर्शनास आले आहे की, एखादी बैठक लागल्यावर / शासनाकडून मागविल्यावर, एकत्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र आयत्यावेळी माहिती गोळा करण्याच्या कार्यपद्धतीमुळे, माहिती एकत्रित तर होत नाहीच, मात्र चुकीची माहिती सादर केली जाते. हे उचित नाही. उपरोक्त कार्यवाही सेवाविषयक व सातत्याने चालणारी असल्याने त्याबाबतच्या माहितीचा डाटा अद्ययावत ठेवणे ही नियुक्ती प्राधिकाऱ्याची जबाबदारी आहे. जेणेकरुन अशी माहिती मागविल्यानंतर ती तात्काळ उपलब्ध करुन देता येईल. सबब, त्यानुसार कार्यवाही करावी.

**उपरोक्त प्रत्येक मुद्दयाची, मुद्देनिहाय माहिती, त्याकरिता विहीत केलेल्या प्रपत्रानुसार, पंधरा (१५) दिवसात सादर करण्यात यावी. सदर माहितीमध्ये प्रत्येक संचालनालयाच्या / विद्यापीठाच्या अधिनस्त असलेल्या, सर्व क्षेत्रिय कार्यालयांच्या माहितीचा अंतर्भाव करणे क्रमप्राप्त आहे. माहिती सादर करताना तशा आशयाचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.**

**आपला,**

**( बा. म. राऊत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत सर्व संचालक आणि सर्व कुलसचिव यांच्याकडे अग्रेषित :
त्यांनी उपरोक्त मुद्दयांची माहिती शासनाकडे तात्काळ सादर करावी.

प्रत माहितीस्तव : *मा. प्रधान सचिव ( उच्च व तंत्रशिक्षण) यांचे स्वीय सहायक*

## विवरण पत्र -९

### सरळ सेवा भरती

### गट - अ

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT ( C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OBC १९ % | OPEN ४८ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | | |

### गट - ब

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT ( C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OBC १९ % | OPEN ४८ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | | |

### गट - क

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT ( C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OBC १९ % | OPEN ४८ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | | |

### गट - ड

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT ( C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OBC १९ % | OPEN ४८ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | | |

### गट - अ, ब, क, ड

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT ( C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OBC १९ % | OPEN ४८ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | | |

## विवरण पत्र -२

### पदोन्नती

#### गट - अ

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT(C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OPEN ६७ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | |

#### गट - ब

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT(C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OPEN ६७ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | |

#### गट - क

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT(C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OPEN ६७ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | |

#### गट - ड

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT(C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OPEN ६७ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | |

#### गट - अ, ब, क, ड

| | एकूण | SC १३ % | ST ७ % | VJ (A) ३ % | NT (B) २.५ % | NT (C) ३.५ % | NT (D) २ % | SBC २% | OPEN ६७ % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | | | | | | | | | |
| भरलेली पदे | | | | | | | | | |
| रिक्त पदे | | | | | | | | | |
| अनुशेष | | | | | | | | | |